In view of General Circular Nos.14/2020, 17/2020, 20/2020 , 02/2021, 19/2021, 21/2021, 02/2022, 10/2022 and 09/2023 dated April 8, 2020, April 13, 2020, May 5, 2020, January 13,2021, December 8, 2021, December 14, 2021, May 05, 2022, December 28, 2022 and September 25, 2023 respectively, issued by the Ministry of Corporate Affairs **(“MCA Circulars”)** and Circular No. SEBI/HO/CFD/ CMD1/CIR/P/2020/79 dated May 12, 2020, SEBI/HO/CFD/CMD2/CIR/P/2021/11 dated January 15, 2021; SEBI/HO/CFD/CMD2/CIR/P/2022/62 dated May 13, 2022 and SEBI/HO/CFD/PoD-2/P/CIR/2023/4 dated January 5, 2023 issued by the Securities and Exchange Board of India **(“SEBI Circular”)** and in compliance with the provisions of the Companies Act, 2013 **(“the Act”)** and the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 **(“SEBI Listing Regulations”)**, the EOGM of the Company is being conducted through Video Conferencing / Other Audio Visual Means (VC/ OAVM) Facility, which does not require physical presence of Members at a common venue. The deemed venue for the EGM shall be Registered Office of the Company.

The Notice of the EOGM will be sent only to those members, whose e-mail addresses are registered with the Company / Link Intime India Pvt. Ltd., **(“Registrar and Share Transfer Agent / RTA”)** or with the respective Depositary Participants in accordance with the MCA Circulars and SEBI Circular. Members may note that the Notice of the EOGM will also be available on the Company’s Website at www.capriloans.in, and on the website of NSDL at www.evoting.nsdl.com and on the website of the Stock Exchanges on which the shares of the Company are listed i.e. www.bseindia.com and www.nseindia.com. The instructions for joining the EOGM are provided in the Notice of EOGM. Members participating through VC/ OAVM shall be counted for reckoning the quorum under Section 103 of the Act.

The Company is pleased to provide remote e-Voting facility **(‘remote e-Voting’)** to all its Members to cast their votes on all resolutions set out in the Notice of the EOGM. Additionally, the Company shall also provide the facility of e-Voting during the EGM. Detailed procedure for remote e-Voting before the AGM / e-Voting during the EGM will be provided in the EOGM Notice.

Members holding the shares in physical and de-mat form who have not registered their e-mail addresses with the Company/ Registrar & Share Transfer Agent or with the respective Depository Participants can get their email IDs registered with RTA by sending e-mail: rnt.helpdesk@linkintime.co.in, on or before Tuesday, January 30, 2024 to receive the Notice of EOGM through email and/ or attending the EOGM through VC/ OAVM.

The above information is being issued for the benefit of all the members of the Company and is in compliance with the MCA Circulars and the SEBI Circular.

For Capri Global Capital Limited
Sd/-
Date: January 27, 2024 **Yashesh Bhatt**
Place: Mumbai **Company Secretary**

HDFC BANK

Head Office: HDFC Bank Ltd., HDFC Bank House, Senapati Bapat Marg, Lower Parel (West), Mumbai-400013
Regional Office: HDFC Bank Ltd., Department For Special Operations, at 3rd Floor, Shivalik-3, Nr. Drive In Cinema, Drive In Road, Bodekdev, Ahmedabad -380054.

E-AUCTION SALE NOTICE

PUBLIC NOTICE FOR E-AUCTION FOR SALE OF IMMOVABLE PROPERTIES

E-Auction Sale Notice for Sale of immovable property mortgaged to Bank under Securitization and Reconstruction of Financial assets and Enforcement of Security Interest Act, 2002 read with proviso to Rule 8(6) of the Security Interest (Enforcement) Rule, 2002.

Notice is hereby given to the public in general and in particular to the Borrower(s)/Mortgagor(s)/Guarantor(s) that, the Authorized Officer(s) of HDFC BANK LTD. (the Bank) had taken physical possession of the following property mentioned, pursuant to demand raised vide notice(s) issued under Sec 13(2) of the Securitization and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2002 in the following loan accounts with right to sell the same on "AS IS WHERE IS, AS IS WHAT IS, WHATEVER IS THERE IS AND WITHOUT RECOURSE BASIS" for realization of Bank’s dues plus interest as detailed hereunder and whereas consequent upon failure to repay the dues, the undersigned in exercise of power conferred under Section 13(4) of the said Act read with Rule 8 of the said Rules proposes to realize the Bank’s dues by sale of the said property/ies. The subject mortgage property is also cross collateralized against credit facilities availed by Oceanic Vehicles Pvt. Ltd. The sale of the below-mentioned Property shall be conducted by way of E-Auction through Web Portal: https://www.bankeauctions.com. **TERMS & CONDITIONS:**

Names of the Branch & Account	Name of the Mortgagor & Guarantor’s of the Property	Details of Collateral Property	Reserve Price / EMD / Bid Increase Amount	Inspection Date and Time	Date / Time of E-Auction
HDFC Bank Ltd., Branch - Navrangpura, Ahmedabad & Yagnik Road, Rajkot. A/c No. 00060450000471, 00060450000481, 01010450000737 & 01010450000747	**Mortgagor: Oceanic Vehicles Pvt. Ltd., Guarantors: Mr. Kanniyo Thakkar, Khushi Thakkar, Oceanic Vehicles Pvt. Ltd., Oceanic Motors Pvt. Ltd.**	Unit No. 201 to 206 admeasuring 1295.48 Sq.Mtr. on Second Floor in the Scheme Tej Enclave, Constructed on T.P. No. 3 FP 508/1 of Mouje Chhadvad Sub. District Ahmedabad - 380003 (Memnagar) & Registration District Ahmedabad. Owned by Oceanic Vehicles Pvt. Ltd. East: Other Property, West: Margin & TP Road, North: TP Road, South: Other Property.	**Rs. 11,52,00,000/-** **EMD AMT Rs. 1,15,20,000/-** **Rs. 2,00,000/-**	**06th February 2024 from 02.00 PM to 05.00 PM**	**20.02.2024 at 02.00 PM to 03.00 PM** **Last Date of Receipt of Bids alongwith EMD** **13.02.2024 upto 4 PM**
Amount as per Demand Notice / Demand Notice Date			**Name of Authorised Officer / Phone No. / Email id:** Anil Sankhla / 09512999191 / anil.sankhla@hdfcbank.com		
Rs. 13,31,77,117.62/-, Demand Notice Dated: 14.06.2021 & Corrigendum to it dated: 23.07.2021					

TERMS & CONDITIONS:

1. The e-Auction is being held on "AS IS WHERE IS, AS IS WHAT IS, WHATEVER IS THERE IS AND WITHOUT RECOURSE BASIS"
2. The interested bidders shall submit their EMD details and documents through Web Portal: **https://www.bankeauctions.com** (the user ID & Password can be obtained free of cost by registering name with **https://www.bankeauctions.com)** through Login ID & Password. The EMD shall be payable EITHER through NEFT / RTGS in the following **Account: 57500000904261, Name of the Account:** DFSO Transitory account, **Name of the Beneficiary:** HDFC BANK LTD., **IFSC Code:** HDFC0000240. Please note that the Cheques / Demand Drafts shall not be accepted as EMD amount.
3. To the best of knowledge and information of the Authorized Officer, there is no encumbrance i.e. statutory dues like property taxes, society dues etc as per Banks’s record on the property other than the one leasehold rights created which is mentioned in detailed terms and conditions. The Bank however shall not be responsible for any present/past/future outstanding non-statutory dues /statutory dues/encumbrances/tax arrears/litigations, if any. The intending bidders should make their own independent inquiries regarding the encumbrances, title of property & to inspect & satisfy themselves. The Mortgagor has also entered into a lease agreement with the HDFC Bank Ltd. for property is auction. The sale of property is with lease hold rights of HDFC Bank Ltd. **Property can be inspected strictly on the above mentioned date and time.**
4. The intended bidders who have deposited the EMD and require assistance in creating Login ID & Password, uploading data, submitting bid, training on e-bidding process etc., may contact our service provider **M/s. C1 India Pvt. Ltd.,** 3rd Floor, Plot No. 68, Sector 44, Gurgaon, Haryana-122003. **Helpline Nos :** 7291981124/1125/1126, **Mr. Bhavik Pandya Mobile : 8866682937. Help Line e-mail ID:** support@bankeauctions.com and for any property related query may contact the **Authorized officer as mentioned above in** office hours during the working days. **(10:00 AM to 5:00 PM).**
5. If the Sale Price is more than **Rs.50,00,000/-** (Rupees Fifty Lakh Only) then the auction purchaser/successful bidder has to deduct 1% of the Sale Price as TDS in the name of the owner of the property & remit it to Income Tax Department as per section 194 IA of Income Tax Act and only 99% of the Sale Price has to be remitted to the Bank. The Sale Certificate will be issued only on receipt of Form 26QB & Challan for having remitted the TDS.
6. The highest bid shall be subject

अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी 'बार्टी' प्रमाणे संस्थेची मागणी

मुंबई : अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणासाठी 'बार्टी', 'सारथी', 'महाज्योती', 'अमृत' या संस्थांच्या धर्तीवर 'भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्था' स्थापन करावी, अशी मागणी समाजवादी पक्षाचे भिवंडीचे आमदार रईस शेख यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि नोकरीमध्ये आरक्षण नाही. परिणामी, बहुतांशी विद्यार्थी शिक्षणापासून आणि पर्यायाने विकासापासून वंचित राहत असल्याचे शेख यांनी म्हटले आहे.

अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी व युवक-युवतींच्या उन्नतीसाठी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ आर्थिक साहाय्य देते. मात्र या मंडळाच्या योजना या कर्ज योजना आहेत. त्यात जामीनदाराची अट आहे. तसेच कर्जफेडीस कसूर झाल्यास कर्ज मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई होते. त्यामुळे कर्जसुविधेचा लाभ अत्यंत मर्यादित असल्याचा दावा आमदार शेख यांनी केला आहे.

विरारचे निसर्ग पर्यटन केंद्र बंद

कल्पेश भोईर, लोकसत्ता

जनजागृतीच्या अभावामुळे मारंबळपाडा येथील पर्यटनाला फटका

वसई : विरारच्या मारंबळ पाडा येथे गाजावाजा करून सुरू करण्यात आलेले निसर्ग पर्यटन केंद्र वर्षभरातच बंद पडले आहे. केंद्राबाबत पुरेसी जनजागृती नाही तसेच फेरी बोट सेवा दुसऱ्या ठिकाणी असल्यामुळे पर्यटकांनी पाठ फिरवली आहे.

कांदळवनाचे संवर्धन व्हावे तसेच स्थानिकांना रोजगार मिळावा या अनुषंगाने शासनाच्या कांदळवन विभागाच्या 'कांदळवन संरक्षण व उपजीविका निर्माण योजना' या अंतर्गत विविध प्रकल्प राबविण्यात येत असतात. विरार जवळील मारंबळपाडा निसर्गरम्य तसेच विविध प्रजातीचे कांदळवन असलेला परिसर आहे. हा परिसर निसर्ग पर्यटन म्हणून विकसित करण्यात आला आहे. या कांदळवनांचे संवर्धन व्हावे व याची माहिती नागरिकांपर्यंत पोहचावी यासाठी या भागात माहिती केंद्र तयार करण्यात आले आहे. मात्र मागील सात ते आठ महिन्यापासून हे केंद्र बंद आहे. त्यामुळे पर्यटकांना या केंद्राचा लाभ घेता येत नाही असे पर्यटकांनी सांगितले आहे.

माहिती केंद्र आणि फेरीबोटमधील अंतराचा परिणाम

या केंद्राची पुन्हा एकदा स्थिती जाणून घेऊन अडचणी समजून त्यावर उपाययोजना करून केंद्र अधिक प्रभावीपणे कसे सुरू राहील यासाठी प्रयत्न करू. या ठिकाणी 'कयाकिंग' राईड उपक्रम, पर्यटकांसाठी खानावळ, इतर नावीन्यपूर्ण सुविधा देण्यात येतील.
– सागर आरडेकर, वनपरिक्षेत्र अधिकारी, कांदळवन विभाग

पर्यटन माहिती केंद्रातील सुविधा...

- हे केंद्र महाराष्ट्र मेरिटाईम मंडळाच्या मालकीच्या जागेवर उभारले आहे. कांदळवनांचे कोणतेही नुकसान न करता तीन कंटेनरच्या माध्यमातून हे केंद्र बांधण्यात आले आहे.
- या केंद्राला योग्य असे कुंपण आणि सीसीटीव्ही कॅमेरा सुविधा आहेत. या केंद्रावर ४५ लाख रुपये खर्च करण्यात आले आहे.
- या केंद्रात मारंबळपाडा परिसराची ओळख, स्थानिक पक्षी व याभागात आश्रयाला येणारे पक्षी, जलचर प्राणी व त्यांची अन्नसाखळी, विविध कांदळवन प्रजातींची माहिती, या उपक्रमाच्या अंतर्गत सुरू केलेली मत्स्यशेती, कचरा व इतर प्लास्टिक यापासून कांदळवनांचे संवर्धन अशा प्रकारची माहिती दिली जाते.

माहिती केंद्र व निसर्गपर्यटनाच्या दृष्टीने कांदळवन विभागाकडून जनजागृती केली जात नसल्याने पर्यटकांना याची माहितीच मिळत नसल्याने पर्यटक इकडे वळत नाहीत. हे माहिती केंद्र जुन्या जेट्टीच्या ठिकाणी आहे. परंतु जेव्हा समुद्राला ओहोटी येते तेव्हा येथील पाणी हे जेट्टीपासून बऱ्याच लांब अंतरावर जाते. त्यामुळे इंद्रायणी फेरी बोट लागण्यास अडचणी येतात. म्हणून ही फेरीबोट नवीन जेट्टीच्या इथून चालविली जाते. माहिती केंद्र एकीकडे व फेरीबोट दुसरीकडे अशी अवस्था आहे त्याचा विपरित परिणाम पर्यटनावर होत आहे.

सुधारित महात्मा फुले जनआरोग्य योजना रखडली

सुहास बिऱ्हाडे, लोकसत्ता

वसई : महात्मा फुले जनआरोग्य योजनेची मर्यादा ५ लाखांपर्यंतची केल्याचा गाजावाजा राज्य शासन करत असले तरी ही घोषणा केवळ कागदावरच राहिली आहे. यासंदर्भातील अध्यादेश काढून ५ महिने उलटले तरी अद्याप सुधारित योजनेची अंमलबजावणी झालेली नाही. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात योजना या योजनेत विलीन करूनही ती लागू झालेली नाही.

सर्वसामान्य रुग्णांना गंभीर आजारावर मोफत उपचार देण्यासाठी राज्य शासनाकडून महात्मा फुले जनआरोग्य योजना राबवली जाते. या योजनेअंतर्गत ९९६ आजारांवर दीड लाखांपर्यंत मोफत उपचार करण्यात येत होते. एक हजारांहून अधिक खासगी रुग्णालयात ही योजना लागू होती. यासाठी केशरी शिधापत्रिकेची अट होती. मात्र, राज्य शासनाने ही योजना अधिक व्यापक करण्याचे घोषित केले. त्यानुसार योजनेची मर्यादा ५ लाखांपर्यंत करण्यात आली तसेच शिधापत्रिकेची अट काढून सर्वांसाठी खुली करण्यात आली. याशिवाय आजारांची संख्या वाढून १३५६ एवढी करण्यात आली. यासंदर्भात २८ जुलै रोजी अध्यादेश काढण्यात आला होता.

या योजनेचा लाभ घ्या, असे आवाहन करणाऱ्या जाहिराती करण्यात येत आहेत. परंतु प्रत्यक्षात वाढीव ५ लाखांच्या सुधारित योजनेची अंमलबजावणी झालेली नाही. ५ महिने होऊन गेले तरी अद्याप ही सुधारित योजना लागू झालेली नाही. विमा कंपनीबरोबर कराराच्या तांत्रिक अडचणींमुळे ती रखडली आहे. लवकरच तांत्रिक अडचणी पूर्ण करून योजनेची अंमलबजावणी केली जाईल, असे योजनेचे प्रमुख शंभरकर यांनी सांगितले.

अंमलबजावणी नाही

महाविकास आघाडी सरकारने २०२० मध्ये स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेची घोषणा केली होती. या अंतर्गत रस्ते अपघातातील जखमींना ३० हजारांपर्यंतचा उपचारांचा खर्च मोफत तसेच एकूण ७४ उपचारांचा समावेश होता. ही योजना तीन वर्षांपासून विविध कारणांमुळे लागू झाली नव्हती. नवीन सुधारित योजनेनुसार या अपघांच्या उपचारांची संख्या ७४ वरून १८४ करण्यात आली तर १ लाखांपर्यंतचा उपचार खर्च मोफत करण्यात आला. त्याचा देखील अध्यादेश २८ जुलै रोजी अध्यादेश काढण्यात आला होता. मात्र, ही योजना देखील अद्याप लागू झालेली नाही.

अपंगासाठी ई-दुचाकीची योजना कागदावरच

निखिल अहिरे, लोकसत्ता

ठाणे : राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त आणि विकास महामंडळ आणि दिव्यांग कल्याण विभाग यांच्या माध्यमातून अपंग व्यक्तींसाठी ई-स्कूटर देण्यात येतात. यासाठी सर्वेक्षण करणे गरजेचे असते. ठाणे जिल्ह्यात याबाबत प्रक्रिया खोळंबल्याने दिव्यांग नागरिकांना व्यापक स्तरावर अद्याप ई - स्कूटर वाटपाची प्रक्रिया राबविण्यात आली नसल्याची माहिती समोर आली आहे. सर्वेक्षण प्रक्रिया राबविण्यासाठी ई- निविदेची प्रक्रिया राबविण्यात येत असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या वतीने देण्यात आली आहे.

ई स्कूटर वितरण योजना हरित ऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन देते आणि पारंपरिक वाहनांच्या जागी इलेक्ट्रिक वाहने घेऊन वायू प्रदूषण कमी करते. १८ ते ६० वर्षांच्या अपंग नागरिकांना ५० टक्के अनुदानात ई-स्कूटर देण्यात येते. ठाणे जिल्ह्यात मात्र अद्याप यासाठीचे सर्वेक्षणच झाले नसल्याचे समोर येत आहे. त्याअंतर्गत अपंग व्यक्तींचे राहण्याचे ठिकाण, त्यांचे वार्षिक/ मासिक उत्पन्न याबाबत माहिती गोळा करण्यात येते.

नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीही याबाबत लोकप्रतिनिधींकडून जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांना विचारणा करण्यात आली होती. तर याबाबत जिल्हा परिषदेकडून कार्यवाही सुरू असल्याची माहिती त्यांनी यावेळेस दिली. जिल्ह्यातील अपंगांबाबतचा सर्व्हे करण्याबाबतची ई निविदा प्रक्रिया सुरू असून ई निविदा प्रक्रिया पूर्ण होताच अपंग सर्वेक्षणाची कार्यवाही तात्काळ करण्यात येईल. तर यापूर्वी ज्या नागरिकांनी वैयक्तिकरीत्या ई वाहने देण्यासाठी अर्ज केले होते, त्यातील पात्र लाभार्थींना देण्याबाबतची कार्यवाही सुरू असल्याची माहिती जिल्हा परिषदेने दिली. मात्र सर्वेक्षणासाठी निविदा राबविण्यास आर्थिक तरतूद नसल्याचे सूत्रांनी सांगितले.

मुंबईतून दररोज सरासरी आठ वाहने लंपास

मुंबई : मुंबईतील रस्त्यांवरून दिवसाला सरासरी ८ वाहनांची चोरीला होत असून गेल्या दोन वर्षांत ५७२५ वाहनांची चोरी झाली आहे. त्यातील केवळ ५५ टक्के गुन्ह्यांची उकल करण्यात यश आले आहे. चोरीला जाणाऱ्या ७० टक्के गुन्ह्यांत असुरक्षित जागेत मोटरगाडी पार्क करणे, हे मुख्य कारण आहे. यामागे मोठ्या टोळ्या कार्यरत आहेत. त्यामुळे मुंबईतील चोरीला गेलेली मोटारगाडीची अगदी नेपाळमध्येही विक्री करण्यात आली आहे.

मोटारगाडी अथवा दुचाकी चोरी करणारे एवढे सराईत असतात की, एखादे वाहन पळवण्यासाठी त्यांना केवळ तीन मिनिटे लागतात. चोरी शक्यतो रात्रीच्या वेळी केली जाते. असुरक्षितरीत्या उभे करणाऱ्या आलेल्या वाहनाच्या शोधात ते शहरभर फिरतात. असुरक्षितस्थळी कार पार्क केलेली आढळली की, हे चोर त्याच मोटारीच्या बाजूला दुसरी मोटार उभी करतात. त्यानंतर टोळीतील एक जण मोटारीचा पेट्रोल टँक कव्हर अथवा बूट लॉक तोडतो. त्यानंतर तो त्याच्या म्होरक्याला संकेत देतो. तो काही सेकंदात मोटारीची बनावट चावी बनवण्यात पटाईत असतो. त्यासाठी 'ब्लॅंक' चावी मोटारीला लावून त्यावर येणाऱ्या ओरखड्यांवरून चावी बनवण्यात येते. तंत्रज्ञानाच्या मदतीनेही बनावट चाव्या बनवल्या जातात. मुंबई पोलिसांनी गेल्यावर्षी एका टोळीला अटक केली होती, ते केवळ लॉक न केलेल्या दुचाकी शोधून त्या चोरायचे.

भाड्याने देणाऱ्या गाडी मालकांकडून मोटारगाडी भाड्याने घेऊनही त्या चोरल्या जातात. त्यानंतर या बनावट वाहन क्रमांकाच्या साहाय्याने मोटार सुरू करून ती पळवून शहराबाहेर नेण्यात येते. त्यामुळे कारच्या मालकाने चोरीची तक्रार नोंदवल्यानंतर पोलीस नियंत्रण कक्षाला चोरीला गेलेल्या मोटारचा क्रमांक देऊनही कार पकडणे कठीण असते. त्यानंतर या चोरी करण्यात आलेल्या मोटारी भिवंडी, पनवेल, नालासोपारा वगैरे ठिकाणी नेण्यात येतात. त्यानंतर ही टोळी चोरीची मोटारगाडी खरेदी करणाऱ्या दुसऱ्या टोळीशी संपर्क साधून मागणीनुसार मोटार तयार असल्याचे सांगते. त्यानंतर मोटार आणण्यासाठी टोळ्या त्यांच्या चालकाला पाठवतात. हे चालक 'कमिशन बेसिस'वर या टोळ्यांसाठी काम करतात.

दोन वर्षांत ५७२५ वाहनांची चोरी

वाहन चोरीत तुलनेत घट

- वाहनांच्या चोरीमध्ये २०२२ च्या तुलनेत २०२३ मध्ये घट झाली आहे. २०२२ मध्ये मुंबईत ३०५८ वाहनांची चोरी झाली होती. तर २०२३ मध्ये २६७१ वाहनांची चोरी झाली आहे. पण तरीही हा आकडा फार मोठा आहे.
- वाहन चोरीचे गुन्ह्यांची उकल होण्याचे प्रमाण फार कमी आहे. २०२२ मध्ये ३०५८ पैकी केवळ १५८८ वाहनांचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले होते.
- २०२३ मध्ये २६७१ पैकी केवळ १५६४ वाहनांचा शोध लागला होता. चोरीमध्ये दुचाकी वाहनांची सख्या अधिक असल्याचे सूत्रांनी सांगितले.

आदिवासींच्या घरकुल योजनेसाठी जागेची अडचण

कल्पेश भोईर, लोकसत्ता

वसई : केंद्र शासनाने आदिवासींना घरे मिळावी यासाठी 'पीएम जनमन योजना' सुरू केली आहे. मात्र योजनेचा लाभ घेण्यासाठी पालघर जिल्ह्यातील अनेक आदिवासी कुटुंबांकडे स्वतःच्या मालकीची जागाच नाही. याशिवाय आधार कार्ड, शिधापत्रिका आदी नसल्यामुळे या योजनेच्या लाभापासून वंचित आहेत.

पालघर जिल्ह्यातील डहाणू, वाडा, जव्हार, मोखाडा, विक्रमगड, वसई, तलासरी, पालघर अशा आठ तालुक्यांत विविध ठिकाणी आदिवासी कातकरी बांधव राहतात.

हे बांधव पोटाची खळगी भरण्यासाठी विविध ठिकाणी स्थलांतर करून आपला उदरनिर्वाह करत असतात. केंद्र शासनाने या आदिवासींना मूळ प्रवाहात आणण्यासाठी 'प्रधानमंत्री जनमन योजना' आखली आहे. यातून या नागरिकांना घरकुल उपलब्ध करून दिली जाणार आहेत. या योजनेतून घरकुलासाठी २ लाख ३९ हजार रुपये इतके अनुदान दिले जाणार आहे. यात १२ हजार रुपये शौचालयासाठी, २७ हजार नरेगा व २ लाख अनुदान असा निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. मात्र आदिवासी कातकरी समाजातील अनेक कुटुंबांकडे स्वतःच्या मालकीची जागा नसल्याने या योजनेचा लाभ मिळणार कसा, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

घरकुल योजनेचा लाभ घेण्यासाठी त्यांच्याकडे आधार कार्ड, रेशन कार्ड, जातीचे दाखले, जॉब कार्ड असे मूलभूत कागदपत्रे नसल्याने शासनाच्या योजनांचा लाभ मिळण्यास अडचणी निर्माण होत आहेत. 'आम्ही मजुरीचे व हाताला मिळेल ते काम करतो. राहण्यासाठी आम्हाला घर नसल्याने ज्या ठिकाणी कामासाठी जातो तिथेच झाप (झोपडी) तयार करून राहत असतो', असे आदिवासी कातकरी बांधवांनी सांगितले आहे.

शासन स्तरावरून घरकुलासाठी प्रयत्न

आदिवासी कातकरी समाजाला त्यांचे हक्काचे घर मिळावे यासाठी पीएम जनमन योजनेतून कुटुंबांचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. पालघर जिल्ह्यात १५ जानेवारीपर्यंत ३४२७ ठिकाणी सर्वेक्षण करण्यात आले. त्यातील २९४८ पात्र ठरले असून त्या २२३१ जणांची नोंदणी करून टप्प्याटप्प्याने प्रक्रिया सुरू आहे. यात सद्यःस्थितीत ३८५ घरकुलासाठी अनुदानाचा पहिला हप्ता देण्यात आला आहे. यात डहाणू ६७, जव्हार ३२, मोखाडा ३५, पालघर ३९, तलासरी १२, वसई ८५, विक्रमगड ८० असून त्यांना पहिल्या टप्प्यात ९० हजारांचे अनुदान देण्यात आले आहे.

'कातकरींना स्थिर करा'

शासनाच्या ज्या योजना आहेत त्यांची कडक अंमलबजावणी व्हायला पाहिजे, कातकरीच जागेवर नसेल तर त्यांना योजना कशी मिळणार. त्यासाठी अगोदर कातकरीला स्थिर करा, प्रत्येक कातकरी कुटुंबाला घरकुलासाठी चार गुंठे जागा देण्याची मागणी शासनाकडे केली आहे, असे राज्याच्या आदिवासी विकास आढावा समितीचे अध्यक्ष विवेक पंडित यांनी सांगितले आहे.

घरकुल योजनांचे काम जिल्हा परिषद स्तरावरून करण्यात येत आहे. घरकुल योजनांचा लाभ मिळावा यासाठी सर्वेक्षण करून मंजुरी जात आहे. ज्यांना जागेची अडचण आहे असा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडून आला तर तो जागा मिळावी यासाठी पाठविला जाईल.
– गोविंद बोडके, जिल्हाधिकारी पालघर

शिवडी-न्हावाशेवा सागरी सेतूवर वाहने सुसाट

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : देशातील सर्वात लांब अशा अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा सागरी सेतूला वाहनचालक-प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. हा सागरी सेतू वाहतूक सेवेत दाखल झाल्या पासून दहा दिवसांत या सागरी सेतूवरून तीन लाख ०९ हजार ०३४ वाहनांनी प्रवास केला आहे. तर या वाहनांच्या माध्यमातून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सहा कोटी १५ हजार २३ हजार रुपये इतका पथकर (टोल) वसूल केला आहे.

शिवडी-न्हावाशेवा अटल सेतू १३ जानेवारीपासून सकाळी ८ वाजता वाहनांसाठी खुला झाला. ताशी १०० किमी वेगाने या सागरी मार्गावरून वाहने धावत असून नवी मुंबई, पनवेल, अलिबाग, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, पुणे या ठिकाणी जाणे सोपे झाले आहे. त्यामुळे पहिल्या दिवसापासून या सागरी सेतूचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळेच लोकार्पणानंतर १३ ते २३ जानेवारी टा कालावधीत या सागरी सेतुवरून तीन लाख ९ हजार ३४ वाहने धावली आहेत. दिवसाला सरासरी २३ हजार वाहने धावत आहेत. सर्वाधिक म्हणजे तब्बल ५४ हजार ९७७ वाहने १४ जानेवारीला धावली आहे.

सागरी सेतूवरून प्रवास करण्यासाठी पथकर मोजवा लागत आहे. यातून एमएमआरडीएला चांगला महसूल प्राप्त होत आहे. सुरुवातीच्या दहा दिवसांत सहा कोटी १५ लाख २३ हजार रुपये इतका पथकर वसूल केला आहे. १४ जानेवारीला सार्वधिक वाहने धावल्याने या दिवशी तब्बल एक कोटी ६ लाख २४ हजार ५७० रुपये असा पथकर वसूल केला आहे. १६ जानेवारीला १९ हजार ५६९ वाहने धावली असून यातून सर्वात कमी ३७ लाख ९४ हजार २४५ रुपये इतका पथकर मिळाला आहे.

अटल सेतूवर १३ ते २३ जानेवारीपर्यंत तीन लाख ९ हजार चालकांकडून सहा कोटी १५ लाखांची पथकर वसुली झाली आहे .

लोकार्पणानंतर अटल सेतूवरून प्रवास केलेल्या वाहनांची संख्या (तारखेनुसार)

दिनांक	वाहनांची संख्या	प्राप्त महसूल अर्थात पथकर (रु.)
१३ जानेवारी	२८,१७६	५४,७७,२९५
१४ जानेवारी	५४,९७७	१,०६,२४,५७०
१५ जानेवारी	२३,२८४	४४,०८,९८५
१६ जानेवारी	१९,५६९	३७,९४,२४५
१७ जानेवारी	१८,३५२	३९,५११,९२०
१८ जानेवारी	२१,३०३	४२,१९,८१०.
१९ जानेवारी	२३,६८८	४७,२१,२७५.
२० जानेवारी	३२,६३७	७४,६७,८०५.
२१ जानेवारी	४२,०९८	८३,३६,४५५.
२२ जानेवारी	२३,१५४	४३,१६,०८०.
२३ जानेवारी	२१, ७९६	४२,०४,५६०.

OM SHANTI



Prabhakar S. Deodhar
25/09/1934 - 27/01/2024

With a heavy heart
we inform you of his sad demise.

Prayer Meeting
Tuesday, 30th January 2024
Time: 5.00pm -7.00pm

Landmark Lawns
Landmark Apts., 175 Carter Road
Bandra West, Mumbai

Aplab

BOROSIL®
बोरोसिल लिमिटेड
CIN: L36100MH2010PLC292722
नोंदणीकृत कार्यालय : ११०१, ११ वा मजला, क्रीसेन्झो, जी-ब्लॉक, एमसीए क्लब समोर, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०००५१.
फोन क्र. : ०२२-६७४०६३०० फॅक्स क्र. : ०२२-६७४०६५१४
वेबसाईट : www.borosil.com, ई-मेल: bl.secretarial@borosil.com

अतिरिक्त सामान्य सर्वसाधारण सभेची सूचना

कंपनीची, **अतिरिक्त सामान्य सर्वसाधारण सभेची सूचना (''ईजीएम'')** बोलाविणाऱ्या सूचने मध्ये देण्यात आलेल्या विषयावर विचार करण्यासाठी कंपनी व्यवहार मंत्रालय **(''एमसीए'')** आणि भारतीय प्रतिभूती विनिमय बोर्ड **(''सेबी'')** ह्यांच्याद्वारे जारी करण्यात आलेल्या आणि लागू असलेल्या परीपत्रकासह वाचल्या जाणाऱ्या कंपनी कायदा २०१३ आणि त्याअंतर्गत करण्यात आलेली नियमावली आणि भारतीय प्रतिभूती आणि विनिमय बोर्डाच्या (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँड डिस्क्लोसर रिक्वायरमेंट्स) नियमावली, २०१५ च्या सर्व लागू असलेल्या तरतुदींच्या अनुपालनार्थ **मंगळवार, फेब्रुवारी २०, २०२४ रोजी दुपारी ०३:०० वाजता (भाप्रवे)** व्हिडियो कॉन्फरसिंग (''व्हीसी'') सुविधाद्वारे ईजीएम निश्चित करण्यात आली आहे.

अतिरिक्त सर्वसाधारण सभेची सूचना १९ जानेवारी २०२४ पर्यन्त शेअर्स धारण केलेल्या सर्व समभागधारकांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवण्यात आली आहे, ज्यांच्या ई-मेल आयडीची नोंद रजिस्ट्रार आणि ट्रान्स्फर एजंट/ डिपॉझिटरीज ह्यांच्याकडे केली आहे. सूचनेसह नमूद वार्षिक अहवाल कंपनीच्या www.borosil.com ह्या संकेतस्थळावर आणि बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com ह्या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे. ईजीएमची सूचना नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ("एनएसडीएल") च्या www.evoting.nsdl.com या सकेंतस्थळावर उपलब्ध आहे, व्हीसी आणि ई-व्होटिंग सुविधेसाठी (म्हणजे रिमोट व्होटिंग आणि ईजीएम दरम्यान ई-व्होटिंगसाठी) कंपनीने एजन्सी नियुक्त केलेली एजन्सी आहे.

ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याचे आणि व्हीसीद्वारे ईजीएममध्ये हजर राहण्याचे स्वरूप :
कंपनीकडून त्यांच्या भागधारकांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे म्हणजेच ई-व्होटिंग मतदानाचा अधिकार बजावता यावा ह्यासाठी ई-व्होटिंग सुविधा तरतूद करण्यात आली आहे. ई-व्होटिंग आणि व्हीसीद्वारे ईजीएमला हजर राहण्याची प्रक्रिया सूचनेच्या अनुभागामध्ये देण्यात आली आहे. रिमोट ई-व्होटिंग कालावधी आणि ई-व्होटिंगसाठी लॉग इन आणि ईजीएमला हजर राहण्याचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:

ईव्हीईएन	१२७५९९
ई-व्होटिंगसाठी आणि ईजीएमला हजर राहण्यासाठी पात्रता निश्चित करण्यासाठी कट ऑफ दिनांक	मंगळवार, फेब्रुवारी १३, २०२४
रिमोट ई - व्होटिंगची सुरवात	शुक्रवार, फेब्रुवारी १६, २०२४ (स. ०९:०० वा. भाप्रवे)
रिमोट ई - व्होटिंग समाप्ती	सोमवार, फेब्रुवारी १९, २०२४ (सायं. ०५:०० वा. भाप्रवे)
युजर आयडी आणि पासवर्ड	नोटीसमध्ये तपशीलवार प्रकिया आणि सुचना नमूद केल्या आहेत.

टिप : उपरोक्त नमूद दिनांक आणि वेळेनंतर रिमोट ई-व्होटिंग करता येणार नाही.

ज्या व्यक्तींची नावे कट ऑफ दिनांकाच्या अनुसार सभासदांची नोंदवही आणि रजिस्ट्रार आणि ट्रान्स्फर एजंट/डिपॉझिटरीज ह्यांच्या द्वारे राखल्या जाणाऱ्या लाभार्थी मालकांच्या नोंदवहीमध्ये आली आहेत, केवळ तेच ई-व्होटिंग सुविधेचा वापर करण्यासाठी आणि ईजीएमला हजर राहण्यास पात्र असतील. मतदानाचे अधिकार कट ऑफ दिनांकानुसार कंपनीच्या भरणा केलेल्या भाग भांडवलामध्ये त्याच्या/तिच्या/त्यांच्या भाग धारणेच्या प्रमाणामध्ये निश्चित करण्यात येतील. जी व्यक्ती कट ऑफ दिनांकानुसार कंपनीची सभासद नाही त्यांनी सदर सूचना केवळ त्यांच्या माहितीसाठी असल्याचे समजावे. कोणी व्यक्ती **जानेवारी १९, २०२४** नंतर भागधारक झाले आहेत आणि ज्यांनी कट ऑफ दिनांकानुसार भाग धारणा केली आहे, त्यांना सूचनेमध्ये देण्यात आलेल्या प्रक्रियेचे पालन करून ई-व्होटिंगद्वारे त्यांच्या मतदानाचा अधिकार बजावता येईल आणि ईजीएमला हजर राहता येईल. समभागधारक ज्यांनी प्रत्यक्ष स्वरूपात भाग धारणा केली आहे किंवा समभागधारक ज्यांनी त्यांच्या ई-मेल आयडीची नोंद केलेली नाही, त्यांनादेखील सूचनेमध्ये देण्यात आलेल्या प्रक्रियेचे पालन करून ई-व्होटिंगद्वारे त्यांच्या मतदानाचा अधिकार बजावता येईल आणि ईजीएमला हजर राहता येईल.

ईजीएमला हजर असलेले भागधारक ज्यांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारे ह्यापूर्वी मतदान केलेले नाही ते ईजीएमदरम्यान त्यांचे मतदान ई-व्होटिंगद्वारे करण्यास पात्र असतील. भागधारक ज्यांनी त्यांचे मतदान रिमोट ई-व्होटिंगद्वारे केले आहे त्यांना ईजीएमला हजर राहता येईल, परंतु ते परत मतदान करण्यास पात्र नसतील. केवळ असे भागधारक जे व्हीसीद्वारे ईजीएमला हजर असतील आणि ज्यांनी त्यांचे मतदान रिमोट ई-व्होटिंगद्वारे केलेले नसेल ते ईजीएमदरम्यान उपलब्ध असलेल्या ई-व्होटिंग सिस्टीमद्वारे मतदान करण्यास पात्र असतील. जर भागधारकाद्वारे ईजीएमदरम्यान उपलब्ध असलेल्या ई-व्होटिंग सिस्टीमद्वारे कोणतेही मतदान झाले असल्यास आणि तोच मतदार व्हीसीद्वारे ईजीएममध्ये सहभागी झाला नसल्यास, अशा सभासदाद्वारे झालेले मतदान वैध समजले जाणार नाही. भागधारकाद्वारे ठरावावर एकदा मतदान करण्यात आल्यानंतर भागधारकाला परत ते बदलता येणार नाही.

एनएसडीएल ई-व्होटिंग सिस्टम संबंधित सर्व समस्या/तक्रारी ह्यासंदर्भात श्री. अनुभव सक्सेना, सहा. व्यवस्थापक, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड, ट्रेड वर्ल्ड, 'ए' विंग, ४ था मजला, कमला मिल्स कंपाउंड, सेनापती बापट मार्ग, लोवर परेल, मुंबई - ४०००१३ येथे किंवा ई-मेल evoting@nsdl.co.in वर मेल करावे किंवा ०२२ ४८८६७००० आणि ०२२ २४९९७००० ह्या नंबरवर संपर्क साधावा.

ई-मेल आयडी, बँक खाते तपशिल इत्यादी नोंदविण्याचे /अपडेट करण्याचे स्वरूप :

१. भागधारक ज्यांनी प्रत्यक्ष स्वरूपात भागधारणा केली आहे, त्यांना पॅन (आधारशी संलग्न), उत्तराधिकारी तपशिल (विद्यमान नामांकन वगळणे किंवा रद्द करणे) संपर्क तपशिल (पिनकोडसह पत्ता, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी) बँक खाते तपशिल (बँकेचे नाव, शाखेचे नाव, खाते क्रमांक आणि आयएफएस कोड) आणि सहीचा नमुना कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्स्फर एजंट ("आरटीए"), लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (युनिट: बोरोसिल लिमिटेड, पत्ता: सी १०१, २४७ पार्क, एलबीएस रोड, विक्रोळी पश्चिम, मुंबई - ४०००८३, फॅक्स क्रमांक: (०२२) ४९१८ ६०६०) ह्यांच्याकडे सादर करण्याची विनंती करण्यात येत आहे. उपरोक्त माहिती उपलब्ध करून देण्यासाठी सेबीद्वारे विहित करण्यात आलेले संबंधित अर्ज कंपनीचे संकेतस्थळ www.borosil.com वर तसेच आरटीएचे संकेतस्थळ www.linkintime.co.in. वर देखील उपलब्ध आहेत. उपरोक्त नमूद अर्ज सादर करण्याच्या संदर्भात भागधारक आरटीएला (०२२) ४९१८ ६००० वर संपर्क साधू शकतात किंवा rnt.helpdesk@linkintime.co.in वर ई-मेल करू शकतात.

२. प्रत्यक्ष स्वरूपामध्ये भागधारणा करणाऱ्या भागधारकांना पॅन (आधारशी संलग्न), उत्तराधिकारी तपशिल, संपर्क तपशिल (पिनकोडसह पत्ता, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी), बँक खाते तपशिल (बँकेचे नाव, शाखेचे नाव, खाते क्रमांक आणि आयएफएस कोड) आणि सहीचा नमुना संबंधित डिपॉझिटरी सहभागींसोबत नोंदणी/अपडेट करण्याची विनंती करण्यात येत आहे.

बोरोसिल लिमिटेड करीता
अंशु अगरवाल
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
सदस्यता क्रमांक : एफसीएस-९९२१

दिनांक: जानेवारी २७, २०२४
ठिकाण: मुंबई